
2018-19



Peer Reviewed Referred
and UGC Listed Journal
Journal No. 40776

An International
Multidisciplinary
Quarterly Research Journal

ISSN 2277 - 5730

# AJANTA

Volume - VII, Issue - IV,
October - December - 2018
Marathi Part - III /
Hindi Part - II

Impact Factor - 5.5
(www.sjifactor.com)

AJANTA
PRAKASHAN

VOLUME - VII, ISSUE - IV - October - December - 2018
**AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)**

# CONTENTS OF MARATHI PART - III


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संत विचार आणि आचार यांचा सुरेख संगम म्हणजे आषाढी वारी<br>**प्रा. सुनिता गोरख रोकडे** | १-४ |
| २ | विभिन्न राज्यामध्ये राबविण्यात येणाऱ्या गृहनिर्माण योजनांचा आढावा<br>**प्रा. नरेश शंकरराव इंगळे** | ५-८ |
| ३ | जागतिकीकरणाची भारतीय शेतीपुढील आव्हाने व शेतकरी आत्महत्या<br>**Dr. (Mrs.) Anita V. Mahawadiwar** | ९-१४ |
| ४ | जागतिक मानव विकास निर्देशांक व भारत<br>**डॉ. विजया एच. राऊत** | १५-२२ |
| ५ | महिला सबलीकरण - एक आकलन<br>**प्रा. डॉ. सौ. उज्ज्वला आर. पाटील** | २३-२६ |
| ६ | शेतकऱ्यांच्या आत्मकथा - एक चिंतन<br>**डॉ. विजय शंकरराव दिघोरे** | २७-३० |
| ७ | भारतीय संविधान : भारताच्या आर्थिक विकासाचे इंजिन<br>**डॉ. सुरेश क. मगरे** | ३१-३६ |
| ८ | भारतासमोरील आव्हाने - जातिव्यवस्था<br>**प्रा. विनोद महादेवराव पुनवटकर** | ३७-३९ |
| ९ | जागतिकीकरणामुळे शिक्षणातील होणारे परिवर्तन<br>**प्रा. संजय दौलतराव बेले** | ४०-४५ |
| १० | चंद्रपूर जिल्ह्यातील सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगांचा अभ्यास<br>**गिरीश टी. पंचभाई**<br>**डॉ. योगेश वाय. दुधपचारे** | ४६-५१ |
| ११ | छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेत इतर जातीचे योगदान: एक अध्ययन<br>**प्रा. प्रविण श्रीकृष्णा राऊत** | ५२-५८ |
| १२ | पर्यावरण एक अभ्यास<br>**डॉ. एन. पी. कुडकेकर** | ५९-६३ |

# ३. जागतिकीकरणाची भारतीय शेतीपुढील आव्हाने व शेतकरी आत्महत्या

**Dr. (Mrs.) Anita V. Mahawadiwar**
Assistant Professor, Department of Commerce, Bhiwapur Mahavidyalaya, Bhiwapur.

## प्रास्ताविक

भारत हा कृषीप्रधान देश आहे असे आपण म्हणतो. परंतु कृषीप्रधान देश असणाऱ्या भारत देशात देशाचा कणा असणारा शेतकरी दिवसभर राब राब राबतो, कष्ट करतो परंतु देशाला स्वातंत्र्य मिळून अर्धशतक होऊनही त्याच्या आर्थिक स्थितीत मात्र अजूनही सुधारणा झालेली दिसून येत नाही. त्याच्या नशिबी सदैव दारिद्रयच पूजलेले आपल्याला दिसून येते म्हणूनच शेतकरी कर्जात जन्मतो, कर्जातच जगतो व कर्जातच मरतो असे म्हण्टले जाते. तेव्हा ही सुधारणा होणे फार गरजेचे आहे. इतर क्षेत्रांप्रमाणेच कृषीक्षेत्रात देखील शेतकऱ्याच्या परिस्थितीत सुधारणा होऊन देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वाढेल, देशाचा आर्थिक विकास जलद गतीने साधता येईल या आशेने भारताने १९९१ मध्ये नवीन आर्थिक सुधारणांचा अवलंब केला. नवीन आर्थिक सुधारणे अंतर्गत आपण जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण या त्रिसूत्रीचा अवलंब केला. परंतु आपल्या शेतीसाठी जागतिकीकरण हे खरोखरच शाप की वरदान ठरू लागले आहे याची शहनिशा करणे फार गरजेचे ठरू लागले आहे. हीच शहनिशा म्हणजे प्रस्तुत शोधनिबंधाच्या विषयाची निवड होय.

## अध्यनाची उद्दिष्टे

१. जागतिकीकरणाच्या पारंपारिक व आधुनिक संकल्पनांचा अभ्यास करणे.
२. जागतिकीकरणाचा भारतीय शेती क्षेत्रातील प्रभावाचा अभ्यास करणे.
३. जागतिकीकरणाचा शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
४. शेतकरी आत्महत्येस कारणीभूत परिस्थितींचा अभ्यास करणे.

## अध्ययन पध्दती

प्रस्तुत अध्ययनात प्रामुख्याने दुय्यम स्त्रोतांचाच विचार करण्यात आला.

## पारंपारिक संकल्पना

जागतिकीकरणाचा विचार धर्मग्रथातून, धर्मप्रणालीतून व्यक्त झालेला दिसतो. आपापसातील वैर, शत्रुत्व, हेवेदावे बाजूला ठेवून व्यापक विश्वबंधुत्वाची संकल्पना वेगवेगळया धर्मग्रथात दिसते. 'वसुधैव कुटुंबकम्' किंवा 'विश्वची माझे घर' हा विचार धार्मिक, वैचारिक पातळीवर गेल्या अनेक शतकातून मांडला गेला आहे. आजही तो मांडला जात आहेच. याचे महत्वाचे कारण म्हणजे जागतिकीकरणाची ही 'संकल्पना' म्हणून जरी आकर्षक भव्य उदात्त वाटत असली तरी अनेक प्रकारच्या मर्यादांमुळे, आपल्या कुटुंबांचे, गटाचे , समाजाचे, राष्ट्राचे हित हे इतरांपेक्षा महत्वाचे मानले गेले. यातूनच संघर्ष, चीड, युध्द, अत्याचार, शोषण याचाच विस्तार होऊन समन्वयापेक्षा संघर्ष हाच नियम बनला. अशा संघर्षमय चिंताक्रांत, संकुचित विचारांच्या पार्श्वभूमीवर 'विश्वशांतीचे प्रेषित' व प्रत्येक समाजात सर्वच काळात उदयास आलेले दिसतात. विशेष म्हणजे

अशा प्रेषितातील संघर्ष हा देखील नव्या संघर्षाचेच एक महत्वाचे कारण ठरलेला दिसतो. आज जागतिकीकरणाचा जो विचार मांडला जातो. तो उपरोक्त भावनिक, धार्मिक स्वरूपाचा नसून मुख्यत्वेकरून आर्थिक स्वरूपाचा आहे.

**आधुनिक संकल्पना**

जागतिकीकरणाची आधुनिक संकल्पना ही मुख्यत्वे देशादेशांतर्गत व्यापार उदिमावर, भांडवल स्थलांतरावर, तंत्रहस्तांतरावर असलेली बंधने दूर करून मुक्तव्यापाराची प्रस्थापना करणे या अर्थाने प्रामुख्याने घेतली जाते. यामध्ये व्यापार, गुंतवणूक संबंधित आर्थिक बाबी व तद्नुषंगिक राजकीय संकल्पना ही प्रामुख्याने आर्थिक स्वरूपांचीच ठरते. अर्थात याचा गाभा जरी आर्थिक असला तरी त्याची व्याप्ती सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अशा सर्वच बाबींशी संबंध आणणारी आहे. यासाठीच जागतिकीकरणाचे स्वरूप हे सर्वार्थाने सर्वस्पर्शी आणि व्यापक रहाते.

जागतिकीकरण ही संकल्पना चांगली असली तरी दुसऱ्या बाजूने जागतिकीकरणाचा औद्यागिक, कृषी, शिक्षण व इतरही क्षेत्रात शिरकाव होत असल्याने आत्महत्या, बेकारी, गुन्हेगारी यासारख्या सामाजिक प्रश्नांचा विस्तार होवू लागलेला दिसून येतो.

**भारतीय शेती व पंचवार्षिक योजना**

जगात भारत हा 'शेतीप्रधान देश' म्हणून ओळखला जातो. भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आजही शेतीच आहे. देश स्वतंत्र झाला त्यावेळी देशातील ६९टक्के लोकसंख्या शेतीवर अवलंबून होती. आजही देशाची लोकसंख्या वाढूनही ६४ टक्के लोकसंख्या शेती क्षेत्रावरच अवलंबून आहे. शेतीची एकूण अवस्था पाहता असे स्पष्ट होते की, एवढ्या मोठ्या लोकसंख्येला रोजी–रोटी पुरविणाऱ्या शेतीसाठी शासनाने पंचवार्षिक नियोजनाच्या माध्यमातून अपेक्षित खर्च केलेला नाही. यामुळे वीज, पाणी, खते, पतपुरवठा, कृषी मालावर प्रक्रिया करण्यासाठी छोट्या–मोठ्या कारखान्यांची उभारणी कृषी मालाच्या विक्रीची व्यवस्था, शीतगृहे, गोदामे, गावागावांतून पिकणारा भाजीपाला वगैरे नाशवंत वस्तूंची ने–आण करण्यास सार्वजनिक क्षेत्रात जी गुंतवणूक करण्याची गरज होती ती प्रत्येक पंचवार्षिक योजनेच्या काळात दुर्लक्षित करण्यात आली.

**गॅट कराराच्या जाचक तरतूदी**

१९९१ च्या नवीन आर्थिक सुधारणा तसेच जागतिक व्यापार संघटनेच्या माध्यमातून १९९५ मध्ये डंकेल प्रस्तावामध्ये प्रथमच शेती आणि शेतीव्यापार यांचा समावेश केल्याने जागतिक व्यापार संघटनेच्या सभासद देशांनी जकातेत्तर निर्बंध आंतरराष्ट्रीय व्यापारावरून काढून टाकणे. शेतीमालाच्या किंमती ठरविताना उत्पादन खर्च व इतर अडथळे दूर करणे, शेतीमालाच्या निर्यातीला प्रत्यक्ष दिल्या जाणाऱ्या अर्थसाहाय्यात कपात करणे, याचबरोबर बौध्दिक संपदा यासारखे अधिकार मान्य केले आहेत. सारांशरूपाने डंकेल प्रस्तावातील तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत

१. वनस्पतीच्या नवीन जातीवर वनस्पती पैदासदारांचे हक्क.
२. सूक्ष्म जीवांवरील बौध्दिक संपदेचे हक्क.
३. सूक्ष्म जीवनशास्त्राच्या प्रतिक्रियांवरील बौध्दिक संपदेचे हक्क.

भारतात आर्थिक सुधारणा व डंकेल प्रस्ताव मान्य केल्याने प्रत्येक अर्थसंकल्पात शेती, जलसिंचन, ग्रामीण विकास आणि खतावरील अनुदाने या सर्व बाबींवरील जी. डी. पी. च्या प्रमाणातील एकूण खर्चात (योजनांतर्गत आणि योजनाबाह्य) सातत्याने घट होत आहे.

**जागतिकीकरणाचा भारतीय कृषी क्षेत्रावरील प्रभाव**

जागतिकीकरणाकडे देशाच्या जलद विकासाच्या दृष्टीने पाहिले तर करारात सहभागी झाल्यानंतर कराराचे समर्थक अर्थशास्त्रज्ञ व राजकीय नेते म्हणतात की, जगातील देशांना भारतात विविध नैसर्गिक साधनसामुग्री किफायतशीर दरात मिळाल्यामुळे भारतातून शेती उत्पादनाची निर्यात वाढेल, शेतीमालाच्या आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमती भारतीय बाजारातील किंमतीपेक्षा अधिक आहेत. त्यामुळे भारतास परकीय चलन मिळेल. याचबरोबर जागतिक व्यापार संघटनेच्या करारानुसार या विकसित देशांना ते त्यांच्या शेतीला देत असलेल्या अनुदानामधील रक्कम कमी कमी होत त्यांच्या शेतीला देत असलेल्या अनुदानामधील रक्कम कमी कमी होत जाणार व भारतीय शेतकऱ्यांबरोबरच्या स्पर्धेत त्यांचा आज जो वरचष्मा आहे तोही कमी होणार शिवाय भारतातील प्रयोगशाळेत नेहमीच्या परंपरागत संशोधनाऐवजी वेगवेगळया हवामानात टिकून राहणाऱ्या वनस्पतीजन्य बी–बियाणांच्या नवनवीन जाती शोधल्या जातील, संशोधन वृत्तीला चालना मिळून शेती उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल. असा आभास जागतिकीकरणाच्या समर्थकांकडून निर्माण केला जात असतो. परंतु वास्तव काय आहे हे पाहिले तर आश्चर्यच वाटल्याशिवाय राहणार नाही.

**अ. आयातीवरील निर्बंध दूर केले गेले**

आयातीवरील सर्व संख्यात्मक निर्बंध दूर करण्याच्या धोरणांचा एक भाग म्हणून भारताने १९९६ पासून आयातीवरील संख्यात्मक निर्बंध उठविण्यास सुरूवात केली. केवळ आयात राशीवरील बंधने आणि कर कमी करण्यापुरताच डंकेल प्रस्ताव मर्यादित नसून तो आपली गरज नसली तरी आपल्या धान्य उत्पन्नाच्या २ टक्के आयात करणे बंधनकारक ठरविले आहे. जागतिकीकरणात आयातीवरील निर्बंध कशापध्दतीने दूर केले गेले हे पुढील सारणीद्वारे स्पष्ट केले आहे.

तक्ता क. १

वर्षनिहाय आयातीवरील निर्बंध उठविण्यात आलेल्या वस्तू

| वर्ष | आयातीवरील निर्बंध उठविण्यात आलेल्या वस्तू |
|---|---|
| १९९५–९६ | ६१६१ |
| १९९६–९७ | ४८८ |
| १९९७–९८ | ३८१ |
| १९९८–९९ | ८९४–१७६३–१४२९ |
| १ एप्रिल, २००१ | ७१५ |

**ब. बहुराष्ट्रीय कंपन्यांचा शेती क्षेत्रांमध्ये प्रवेश**

जागतिकीकरणाच्या अंमलबजावणीमुळे अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी भारतीय बाजारपेठेमध्ये शिरकाव केलेला आहे. यामधील कारगिल सीड्स, बेजा शीतल सीड्स, सॅडोज, पायोनियर, ओव्हरसाईज कॉर्पोरेशन, आय. टी. सी., अॅग्रोटेक, हिंदुस्थान लिव्हर यांसारख्या बहुराष्ट्रीय कंपन्या शेतीसाठी लागणाऱ्या

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR -5.5 (www.sjifactor.com)

बी–बियाणांच्या बाजारात उतरल्या आहेत. इतकेच नव्हे तर, अमेरिकेतील कारगिल, कॉन्टिनेन्टल ग्रेन आणि युरोपमधील तीन मोठ्या कंपन्या अशा एकूण पाच कंपन्यांच्या हाती जगातला ८० टक्के धान्यबाजार आहे. धान्य आणि धान्यपदार्थ, गहू आणि पीठ मका आणि सोयाबीन तेल, तेल बिया, तेल पेंड, चरबी तंबाखू इ. वस्तू जगात निर्यात करण्यामध्ये अमेरिकेचा पहिला कमांक असल्याने शेतीमालाचा व्यापार करणारा जगातील सर्वात मोठा देश म्हणून अमेरिकेकडे पाहिले जाते. पेप्सी आणि कारगिल ह्या अमेरिकेतील बलाढ्य कंपन्यांनी पंजाब व गुजरातच्या सरकारांबरोबर करार केले आहेत. या करारांप्रमाणे ते आता शेतकऱ्यांबरोबर कंत्राटी पध्दतीने शेती करू शकतात. तसेच बियाणे व गोदामे उपलब्ध करून देऊ शकतात.

**क. शेतकी अनुदानावरील कपात**

डंकेल प्रस्तावानुसार मुक्त आयातीबरोबर शेती उत्पादनावरील अनुदानात कपात केली पाहिजे, असे बंधन असल्याने भारतीय शेती अर्थव्यवस्था संकटात सापडली आहे. कारण आजही भारतातील जवळजवळ ६४ टक्के लोकसंख्या ही शेती व शेतीशी निगडित असणाऱ्या व्यवसायावर अवलंबून आहे. या शेतकऱ्यांमधील ८० टक्के शेतकरी छोटे आणि मध्यम आहेत.

सन १९९८–९९ मधील रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या चलन आणि वित्त अहवालात नमूद करण्यात आले आहे की, खाजगी क्षेत्राच्या गुंतवणुकीचा बहुतांश भाग अल्पकालीन उत्पादकता वाढविण्यासाठी वापरला जातो. दीर्घकालीन मालमत्तेची निर्मिती करण्यासाठी नाही. शेतीच्या विकासाचे सातत्य निर्णायकपणे सार्वजनिक गुंतवणुकीवर अवलंबून असते. गेल्या कित्येक वर्षापासून शेती क्षेत्रातील घटत्या सार्वजनिक गुंतवणुकीचे भारतीय शेतीवर विपरीत परिणाम झाले आहेत. याच अहवालात हे देखील मान्य करण्यात आले की, पंचवार्षिक योजनेत ठेवण्यात आलेले शेती उत्पादनाच्या वार्षिक वाढीचे सरासरी ४.५ टक्के उद्दिष्टे गाठणे कठीण आहे. परंतु विकसित देशांनी २० टक्के तर विकसनशील देशांनी १३.३३ टक्के अनुदान कपात करणे बंधनकारक आहे. यास अनुसरून भारत सरकारने देखील अनुदान कपात करण्यास सुरूवात केली. १९९१ नंतर केंद्र सरकारने पाणी, खते, वीज, इ. करिता शेतकऱ्यांना दिली जाणारी अनुदाने कमी केली आहेत. परंतु विकसित देशांनी अगोदरच आपल्या देशात प्रचंड प्रमाणात अनुदान दिले आहे. उदा. १९८६–८८ या कालावधीत प्रमुख विकसित देशांनी त्यांच्या शेतीसाठी सुमारे २४,७०० कोटी डॉलर्सचे अनुदान दिल्याची नोंद आहे. १९९९ मधे ही रक्कम कमी होण्याऐवजी ती ३२,७०० कोटी डॉलर्सवर गेल्याचे प्रसिध्द झालेल्या आकडेवारीनुसार दिसून येते. इतकेच नव्हे तर जागतिक व्यापार संघटनेचे कार्यवाह मायकेल सूर यांनी असे प्रतिपादन केले की, विकसित देश त्यांच्या शेतीला ग्रीन बॉक्स, ब्लू बॉक्स, अंबर बॉक्स या नावाने दर दिवशी किमान १०० कोटी डॉलर्सचे अनुदान देतात. जागतिक व्यापार संघटनेच्या अटींना भुलून अनेक विकसित देशांनी अनेक मार्गांनी स्वतःच्या देशातील कृषि क्षेत्राला सबसिडी देत असतात. हे पुढील सारणीवरून स्पष्ट केले आहे.

तक्ता क्र. २

विकसित देशांतर्फे देण्यात येणारी अनुदाने

| देश | एकूण कृषिउत्पन्नाच्या प्रमाणात टक्के |
|---|---|
| जपान | ७२.५ : |
| कोलंबिया | ५४.० : |
| द. कोरिया | ६१.० : |
| युरोप | ३७.० : |
| चीन | ३४.० : |
| अमेरिका | २९.० : |
| भारत | ०३.० : |

स्त्रोत: 'जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने' ले. प्रा. जगन कराडे, डायमंड पब्लिकेशन्स,पुणे.

परंतु भारत सरकार आणि बँकिंग क्षेत्रातील सुधारणांविषयी कार्यरत नरसिंहन कमिटीच्या दोन्ही अहवालांमध्ये बँकांनी आपला नफा जास्तीतजास्त वाढविण्यावर लक्ष केंद्रित करावे, असे नमूद केले असून त्यासाठी त्यांनी शेतीक्षेत्राला देण्यात येत असलेली सवलतींची कर्जे हळूहळू बंद करावीत आणि शेतीक्षेत्राच्या वाट्याला येणाऱ्या कर्जाचे आधीचे उद्दिष्ट एकूण निव्वळ कर्जाच्या १८ टक्केपर्यंत रद्द करावे, अशी शिफारस केली आहे. यामुळे भारतीय शेतकरी संकटात सापडले आहेत. याबाबतीत 'दि इकॉलॉजिस्ट' चे संस्थापक संपादक आणि पर्यावरण चळवळीतील विभूती 'एडवर्ड गोल्डस्मिथ' यांचे विचार महत्वपूर्ण आहेत. ते म्हणतात, 'भारतातील दोन–तीन एकरापेक्षा कमी जमीन असलेले शेतकरी जागतिकीकरणात कसे काय टिकू शकतील? ते सर्व शहरांमधल्या झोपडपट्टयांकडे ढकलले जातील आणि तुमचे छोटे दुकानदार, विक्रेते आणि बलुतेदार लोकही उखडले जाण्याची शक्यता आहे, कारण त्यांचे अस्तित्वच मुळी शेतकऱ्यांवर अवलंबून आहे. अशारितीने ६० ते ७० कोटी लोकांना देशोधडीला लावाल आणि त्यांना कंगाल बनवाल.' यावरूनच जागतिकीकरणामुळे भारतीय शेती क्षेत्रात फार मोठी आव्हाने निर्माण झालेली आपल्याला दिसून येतात. याचा परिणाम म्हणून की काय जे अल्पभूधारक शेतकरी आहेत ते शेतकरी आत्महत्येस प्रवृत्तही झालेले दिसून येतात.

**जागतिकीकरण आणि शेतकरी आत्महत्या**

इंग्रजांच्या काळात शेतकऱ्यांचे अपरिमित शोषण झाले असले तरी, नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ अशा भयावह परिस्थितीतही शेतकरी आत्महत्येची विशेष नोंद दिसून येत नाही. परंतु गेल्या काही दशकात शेतकऱ्यांच्या आत्महत्येची संख्या २५ हजारांवर गेली आहे. शेतकरी आत्महत्येच्या अभ्यासातून असे निष्पन्न होते की, यामागे मूळ समाजशास्त्रीय कारणे आहेत. जी. के वीरेश कमिटीच्या म्हणण्यानुसार शेतकरी दारू व मौज मजा करण्यासाठी कर्ज घेतात व त्यामुळे आत्महत्या करतात. इतर अभ्यासातून असे दिसून येते की, शेतकरी लग्न कार्य, सणासुदीसाठी कर्जबाजारी होऊन नंतर आत्महत्या करतो. पण हे विश्लेषण चुकीचे आहे हे म्हणणे वावगे ठरणार नाही. अनेक विद्वानांनी आपआपल्या तत्वाप्रमाणे आत्महत्येची वेगवेगळी कारणे शोधलीत. आधुनिक समाजात माणूस आपल्या जवळीक संबंधापासून अलिप्त होत जातो. त्याच्यावर जेव्हा आर्थिक संकटे येतात तेव्हाच तो आत्महत्येस प्रवृत्त होतो.

याशिवाय शेतकऱ्यांच्या आत्महत्येमागे तीन—चार महत्वाची कारणे सांगता येतील. भारतीय शेती समाजातील आर्थिक व सामाजिक विषमता, राजकीय उदासीनता, बँकांची अकार्यक्षमता आणि कृषी बाजारातील स्पर्धा इ. कारणे आहेत. म्हणजेच वरील संपूर्ण कारणांमध्ये शेतकऱ्याला जेव्हा या आर्थिक समस्या निर्माण होतात. तेव्हाच उर्वरित समस्या जन्म घेतात. स्वातंत्र्यानंतर शासनाने जमीन सुधारणा कायदा आणि कमाल जमीन धारणा कायद्याद्वारे शेती समाजातील आर्थिक व सामाजिक विषमता कमी करण्यासाठी प्रयत्न केला. परंतु बलाढ्य व वरचढ शेतकऱ्यांनी हे कायदे मोडीत काढून जमिनी आपल्याकडेच ठेवल्या व शेती समाजात आपले स्थान व दर्जा बळकावला. लहान शेतकरी लहानच राहिले. शेवटी तो आजपर्यंत कमकुवत म्हणूनच जीवन जगू लागला

## निष्कर्ष

अशाप्रकारे वरील संपूर्ण मुद्यांचा विचार करता जागतिकीकरणाच्या अंमलबजावणीनंतरच्या काळात भारतीय शेतीच्या समस्या कमी होण्याऐवजी अधिकच तीव्र होऊ लागल्या. जागतिकीकरणाच्या प्रकियेमध्ये जरी माणसाला जगण्याचे पर्याय व संधी निर्माण केल्या असल्या तरी, जागतिक पातळीवर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. विकसनशील देशांमध्ये जागतिकीकरणाच्या परिणामांमुळेच हे घडत आहे. आधुनिक समाजात माणूस हा एकलकोंडा व माणसापासूनच दुरावत गेला आहे. अशा समाजात सामाजिक संस्थांची माणसांबरोबर पकड कमकुवत होत जाते व तो नैतिकदृष्ट्या दुर्बल होत जातो. याशिवाय भारतीय शेतकरी जागतिक बाजारपेठेतील तीव्र स्पर्धेला बळी ठरलेला दिसतो. जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांवर आंतराष्ट्रीय कंपन्यांच्या स्पर्धेचा दबाव वाढत आहे. स्थानिक कृषी बाजारपेठेवर सावकार, मोठे जमीनदार, दलाल यांचे वर्चस्व आहे. यामुळे एकाचवेळी लहान शेतकरी अमानुष जागतिक स्पर्धा आणि स्थानिक विषमतेला तोंड देत आहे. आंतरराष्ट्रीय संस्था आणि बाजारपेठेवर नियंत्रण ठेवणाऱ्या पेप्सीको आणि कारगील यासारख्या महाकाय कंपन्यांनी शेतकऱ्यांना जीवन जगणे कठीण केले आहे. म्हणूनच त्याला आत्महत्येशिवाय पर्यायच उरलेला नाही असे वाटायला लागले आहे.

## संदर्भ सूची

१. भोसले व काटे, २०००, 'जागतिक अर्थव्यवस्था', फडके प्रकाशन, कोल्हापूर.
२. देशमुख, डॉ. प्रभाकर, 'भारतीय अर्थशास्त्र', पिंपळापुरे अँन्ड पब्लिशर्स, नागपूर.
३. जे. एफ. पाटील, 'वाढती विषमता: एक समस्या', दैनिक लोकमत, १४ नोव्हेंबर २००७.
४. कराडे, प्रा. जगन, २००८, 'जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
५. Shiva Vandana, 2004, 'The Suicide Economy of Corporate Globalisation', Sage Publications, New Delhi.